# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे**
**फोन.नं. ०२२-२९४५१००१**
**Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र ११९** . **दिनांक- ०५/०५/२०२१**

**मिरा-भाईंदर परिसरात दिवसा व रात्री चैन स्नॅचिंग करणारा आरोपी गजाआड.गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा यांचे कामगिरीत एकुण ७ गुन्हयांची उकल व १०१.३६० ग्रॅम वजनाचे सोने जप्त .**

मागील काही महिन्यांपासून मिराभाईंदर परिसरामध्ये दिवसा व रात्रीच्या वेळी मोटार सायकलवरुन जबरीने सोनसाखळी चैन स्नॅचींगचे गुन्हयांमध्ये वाढ झाली असल्याने, वरिष्ठांनी सदरचे गुन्हे ऊघडकीस आणण्यासाठी सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. I ३०५/२०२१ भा.द.वि.सं कलम ३९२ या चैन स्नॅचींगचे गुन्हयांतील प्राप्त तांत्रिक माहितीनुसार, एक रेकॉर्ड वरील आरोपीत हा सुझुकी बर्गमॅन मोटार सायकल नंबर MH48 9731 चा वापर करून चैनस्नॅचींग करीत असल्याची माहिती प्राप्त झाली.

सदर गुन्हयांतील प्राप्त तांत्रिक माहितीनुसार आरोपीत नामे प्रदीप सोमनाथ बॅनर्जी वय-४१ वर्षे, व्यवसाय-ड्रायव्हर, रा. यादवनगर, हायस्कुलच्या पाठीमागे, बोईसर, ता. पालघर, जि.पालघर. मुळ रा.दलबार पोस्ट भगवानपुर, पोलीस ठाणे भगवानपुर, जि. खडकपुर, राज्य वेस्ट बंगाल. यास दिनांक २६/०४/२०२१ रोजी अटक करण्यात आली असुन त्याने सदर गुन्हयांचे कबुली दिली असुन सदरचा माल आरोपीत नं. ०२ मनोज भोलानाथ सोनी वय-४३ वर्षे, व्यवसाय- सोनार काम, रा. राजलक्ष्मी ज्वेलर्स, शॉप नं. ०३, गावदेवी रोड, न्यु बॉम्बे बेकरी समोर, भांडुप पश्चिम, मुंबई नं. ७८ यास विक्री केला असल्याचे सांगून काढुन दिला आहे.

अटक आरोपी याच्याकडे गुन्ह्यांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये १) काशिमीरा पोस्टे गुन्हा रजि नं. I ४६६/२०२० भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे २) काशिमीरा पोस्टे गुन्हा रजि. नं. I १५७/२०२१ भा.द.वि.सं कलम ३९२ प्रमाणे. ३) काशिमीरा पोस्टे गुन्हा रजि. नं. I २६६/२०२१ भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे. ४) मिरारोड पोस्टे गुन्हा रजि नं. I १५४/२०२१ भा.द.वि.सं कलम ३९२, ३४ प्रमाणे. ५) मिरारोड पोस्टे गुन्हा रजि. नं. I १३५/२०२० भा.द.वि.सं कलम ३९२,३४ प्रमाणे. ६)कस्तुरबा पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. I १२२/२०२१ भा.द.वि.सं कलम ४२० प्रमाणे. ७) समतानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १११८/२०२० भा.द.वि.सं कलम ३७९ प्रमाणे गुन्हे केलेले असल्याची कबुली दिली आहे.

सदर तपासात एकुण ०७ गुन्हे ऊघडकीस आले असून त्यातील एकुण ३,२०,०००/- रुपये किंमतीचे १०१.३६० मि. ग्रॅम वजनाचे सोन्याच्या लगड व मंगळसुत्र तसेच ३५,०००/- रुपये किमतीची सुझुकी बर्गमॅन कंपनीची मोटारसायकल असा एकुण ३,५५,०००/- रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. डॉ. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे),यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, स.फौज. राजु तांबे, पो.हवा./३६ संदीप शिंदे, पो.हवा/२२१७ किशोर वाडीले, पो.हवा./२३७६ अर्जुन जाधव, पोहवा/१८५० संजय शिंदे, पो.हवा./११०९ गर्जे, पो.ना./३०८ पुष्पेंद्र थापा, पो.ना./१६४४ सचिन सावंत, पो.कॉ../३६८७ विकास राजपुत नेम. गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ यांनी केली असून गुन्हयांचा पुढील तपास नयानगर पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

Scanned with CamScanner